International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# महाराष्ट्रातील निवडक लोककलेचा आर्थिक व सामाजिक अभ्यास

**अंत्रे विकास गोधाजी[1], डॉ. सीमा चव्हाण[2]**
[1]विदयावाचस्पती संशोधक विद्यार्थी
[2]सहाय्यक प्राध्यापिका, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, जि. पुणे
**Corresponding author: अंत्रे विकास गोधाजी**
*DOI- 10.5281/zenodo.10279329*

**प्रस्तावना:**

जेव्हा माणूस जंगलात राहून संघर्षमय जीवन जगत होता, तेव्हा चाक आणि अग्नीच्या शोधानंतर तो शेती करू लागला. शिकार करणे, शेती करणे, अग्नि पेटवणे या कला शिकल्यावर तो कुटुंब आणि वसाहत करून राहू लागला. जंगलात भटकणारा माणूस घर करून रहायला लागल्यावर रंजनाच्या पर्यायाचा शोध घेऊ लागला. यातूनच पुढे लोककलेचा व{कास झाला. संस्कृती परंपरांचे जतन करून मानवी जीवनात सुख, शांती निर्माण करण्यासाठी लोककलांचा वापर माणूस करू लागला. प्रत्येक पिढीबरोबर जगण्याचे प्रतिबिंब उमटविणाऱ्या, परंपरा जपणाऱ्या कलांना लोककला म्हटले जाते. तसेच पुस्तकी ज्ञानापेक्षा भिन्न व्यवहारी ज्ञानावर आधारित सामान्य माणसाची जगण्याच्या अनुभूतीची अभिव्यक्ती म्हणजे लोककला. लोककलेतील रंजन व प्रबोधनामुळे चांगल्या विचारांचे रक्षण झाले. त्याचबरोबर अंधविश्वास व भयनिवारणही झाले. जसा माणसाचा बौद्धिक विकास झाला तसतशा लोककला विकसित होत गेल्या.

लोककलेचे अभ्यासक शैलेंद्रनाथ सामंत यांच्या मते मानवी सभ्यतेचा विकास होऊन ग्रामीण जनमाणसाच्या अनुभवांची अभिव्यक्ती म्हणजे लोककला होय. भारतातील संस्कृतिक कलांचा लोककलेशी मोठा संबंध आहे. या संबंधामुळेच लोककला विकसित झाल्या. अनेक युगे आली आणि गेली; परंतु लोककथा, लोकगीते, लोकसंगीत, लोकनाट्य या रुपाने लोककला युगानयुगे जीवंत आहे. लोककलांमध्ये काळानुरूप बदल झाले; परंतु त्यांच्या मूळ ढाच्यात मात्र बदल झाला नाही. भारतातील विवीध राज्यात विविध संस्कृती, परंपरांनुसार अनेक लोककला आहेत. पंजाबमध्ये भांगडा, कर्नाटकात यक्षगाण, उत्तर भारतात नौटंकी, दक्षिण भारतात भरतनाट्यम आदी लोककलांनी त्या त्या राज्यातील संस्कृती, परंपरा जपल्या आहेत. महाराष्ट्राची संस्कृती संपन्न आहे. तशी महाराष्ट्राची सांस्कृतीक भूकही मोठी आहे. कीर्तन, जागरण गोंधळ, डोंबऱ्याचा खेळ, पोवाडा, भारूड, बहुरुपी, वासुदेव, कोळीगीते, जात्यावरच्या ओव्या व लोकनाट्य तमाशा अशी महाराष्ट्रातील लोककलांची समृद्ध परंपरा इथल्या जनतेने जाणीवपूर्वक जोपासली आहे. लोककलांपैकी तमाशा, दशावतार, लावणी, जागरण गोंधळ, कीर्तन, भारूड, गोंधळी, बाल्यानृत्य, लळीत, वासुदेव, पिंगळा या लोककलांनीही प्रबोधनातून समाजाचे मनोरंजन केले. वरील सर्व लोककलांमधून लोकजीवन, लोकसमूह आणि त्या लोकसमूहाच्या परंपरा, रुढींचे प्रतिबिंब उमटत असते. त्याचबरोबर लोकसमूहाचे संस्कृतिक आणि धार्मिक भावविश्वाचेही दर्शन या लोककलांमधून घडत असते. दुर्दैवाने अत्याधुनीक जगाची कास धरणारा माणूस लोककला व लोककलावंतांपासून कोसो दूर जाऊ लागला आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरची दोन दशके लोककलांसाठी सुवर्णकाळ ठरली. सिंचन सुविधांमुळे शेतीचे उत्पन्न वाढले होते. खेडी समृद्ध झाली होती. सहकाराच्या उभारणीतून ग्रामीण भागात समृद्धी आली. जत्रा, यात्रांचे स्वरुप बदलू लागले होते. तेव्हा महाराष्ट्राची जनता ऊस, कुस्त्या व लोककला या तीन फडात रमायची. यात पहील्या फडाणे दुसऱ्या दोन फडांचे अर्थकारण बदलवले.

सन १९९१ च्या सुमारास देशात जागतीकीकरणाला सुरुवात झाली. त्या आधी ग्रामीण भागात दूरदर्शन ही एकमेव वाहीनी दीसत होती. त्यामुळे खेड्यात लोककलेचे अप्रूप कायम होते. जागतीकीकरणामुळे निर्बंध उठले. असंख्य वाहीन्या ग्रामीण भागातही दीसू लागल्या. तालुक्याच्या गावी सीनेमा थीएटर नाट्यगृहे उभी राहीली. यामुळे मनोरंजनाची वेगळी माध्यमे प्रेक्षकांना उपलब्ध झाली. या सगळ्या झगमगाटात लोककला या प्रवाहाबाहेर फेकल्या गेल्या. त्यामुळे लोककलेचे अर्थकारण अडचणीत आले. १९८० आधी महाराष्ट्रात ३५ ते ४० फड २०० दीवस गावोगाव तमाशाचे कार्यक्रम करायचे. उर्वरित काळात मुंबई, पुण्यात बंदीस्त थीएटरमध्ये लोककलेचे खेळ

जोरात असायचे. त्या काळात साखर कारखाने समृद्धीच्या शीखरावर होते. गणेशोत्सवात कारखाने तमाशांना आमंत्रण देत असत. पुढे कारखानदारी अडचणीत आली. त्यात जागतीकीकरणामुळे आलेल्या इतर करमणुकीच्या साधनांमुळे तमाशा भरडला गेला. आता तर इंटरनेट, डिजीटल क्रांतीच्या युगात २०१२ पासून दरवर्षी एक तमाशा बंद पडत गेला. २०१९ पर्यंत महाराष्ट्रात ढोलकी फडाचे अवघे आठ तमाशे उरले. तमाशापाठोपाठ तंत्रज्ञानातील बदलामुळे लावणीवरही संक्रांत आली. लावणीचे कार्यक्रम करणाऱ्या महाराष्ट्रात १०० पेक्षा जास्त ग्रुप आहेत; परंतु कार्यक्रमांची संख्या कमी झाल्याने यातील अनेक कलाकारांची रोजीरोटी धोक्यात आली आहे. दशावतारसारखी कोकणातील ८०० वर्षे जुनी कलाही अडचणीत सापडली आहे. दशावताराने संस्कृती, परंपरा, इतीहास जपला; परंतु दुर्दैवाने ही लोककला कोकणाच्या बाहेर जाऊ शकली नाही. तीला राजाश्रयही कधी मीळाला नाही. त्यामुळे दशावतार सादर करणाèया अनेक कलावंतांना उतारवयात वैफल्यग्रस्त आयुष्य जगावे लागत आहे. माणसं श{कली, म्हणजे सुसंस्कृत झाली, असे नाही. आपल्या शीक्षणाने समाज फक्त साक्षर केला, त्यामुळे हा साक्षर समाज जागरण गोंधळी, बाल्या नृत्य, कीर्तन, भारूड या लोककलांमधील रंजनाच्या माध्यमातून दीला जाणारा प्रबोधनाचा संदेश घेण्यापेक्षा त्यांना अंधश्रद्धाळू ठरविण्यात धन्यता मानतो. त्यामुळे या कला सादर करणारे लोककलावंत आर्थिक अर{ष्टात सापडले आहेत.

दुसरीकडे समाजाच्या अभीरुची बदलांमुळे लोककलांचे अर्थकारणही बदलले होते. काळाशी जुळवून घेण्यासाठी तमाशा, लावणी, दशावतार, जागरण गोंधळ आदींच्या सादरीकरणात झालेल्या बदलामुळे त्यांचा खर्च वाढला; परंतु त्या तुलनेत टिकीटाचे, बीदागीचे दर वाढले नाहीत. याउलट सिनेमा, नाटक, गाण्यांच्या मैफिली या मनोरंजनाच्या प्रकारांचे मागून येऊनही दर वाढले. आज सिनेमाचे टिकीट १५० ते ५००, नाटक १०० ते ५००, गाण्यांची मैफील १००० ते ३००० तर तमाशाचे टिकीट अवघे ६०/- रुपये आहे. यामुळे प्रेक्षक असूनही टिकीट दर न वाढल्याने तमाशा आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडला. उत्पन्नापेक्षा खर्च वाढला. आर्थिक अडचणीतल्या लोककलांना कुठलीही बँक, पतसंस्था कर्ज देत नाही. शासनाची सहकार्याला मदत म्हणावे का? अशा तुटपुंज्या प्रमाणात ती मीळते. सिनेमा बनविण्यासाठी शासन ३० लाखांचे अनुदान देते, नाटकाच्या एका प्रयोगासाठी १० हजार रुपयांचे अनुदान देते, तेच शासन महाराष्ट्राची लोककला तमाशाला ३ वर्षातून एकदा अवघे ६ लाखांचे अनुदान देते. दशावतार, जागरण गोंधळ, लावणी आदी लोककला अद्याप अनुदानाच्या यादीतच नाहीत. या दुजाभावामुळे लोककला आणखी गाळात रुतल्या. त्यामुळे तमाशा मालक, दशावतारच्या कंपन्या, लावणीचालक यांना खासगी सावकाराचे कर्ज घेतल्याशीवाय पर्याय राहीला नाही. खासगी सावकाराच्या कर्जाचा व्याजदर अव्वाच्या सव्वा असल्याने लोककला पथके बंद पडू लागली. जागरण गोंधळ, भारूड, शाहीरी यांचीही बीदागी न वाढल्याने चरितार्थासाठी कर्जबाजारी व्हावे लागले. कर्जाच्या ओझ्यामुळे अनेक लोककला लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. यातील कलाकार, कामगार देशोधडीला लागले. केवळ आर्थिक घडी विस्कटल्याने महाराष्ट्राच्या अस्सल लोककला आज अखेरच्या घटका मोजत आहेत. या लोककलांमध्ये झालेले स्थित्यंतर व त्यांची आर्थिक घडी कशी विस्कटली, ती विस्कटण्यास जबाबदार कोण व लोककलांचे अर्थकारण पूर्वपदावर आणण्यासाठी काय उपाय योजता येतील, म्हणून संशोधकाने जागतीकीकरणानंतर महाराष्ट्रातील लोककलेचा आर्थिक व सामाजिक अभ्यास या विषयातच संशोधन करण्याचे ठरविले आहे. या संशोधनातून लोककलांच्या बदलत्या अर्थकारणाला योग्य दीशा देणे, हाच संशोधकाचा संशोधनामागील हेतू आहे.

**उद्दिष्टे :**

१) महाराष्ट्राच्या लोककलांमधील कलावंत, कामगार व मालक यांच्या आर्थिक, सामाजिक जीवनावरील परिणामांचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्राच्या लोककलासंबंधी शासकीय आर्थिक व सामाजिक धोरणांचा अभ्यास करणे.
३) लोककलेत उद्भवणाऱ्या विविध समस्यांचा शोध घेऊन त्यावर संभाव्य उपाययोजना सुचविणे.

**गृहीतक:** लोककलेत काम करणाऱ्या कलावंतांकडे समाजाच्या पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला आहे.

**संशोधन समस्या:**

जागतीकीकरणाच्या रेट्यात मनोरंजनाच्या क्षेत्रात जी उलथापालथ झाली, त्याला मराठमोळा लोककलाही अपवाद राहील्या नाहीत. ८० च्या दशकाअखेर सुवर्णकाळ अनुभवणारा तमाशा, दशावतार, लावणी आज मरणासन्न अवस्थेत पोहोचल्या आहे. जागतीकीकरणामुळे असंख्य वाहीन्या आल्या. तालुक्याच्या गावी सिनेमागृहे, नाट्यगृहे सुरू झाली. या सगळया झगमगाटात लोककला प्रवाहाबाहेर फेकल्या गेल्या. लोककलांच्या सुवर्णकाळात कलापथके वर्षातले सुमारे २०० दीवस गावोगावी कार्यक्रम करायचे. त्यावेळी महाराष्ट्रातली साखर कारखानदारी जोरात होती. गणेशोत्सवात तमाशांना आमंत्रण असायचे. हळूहळू कारखानदारी अडचणीत आली. दुसरीकडे

जागतीकीकरणामुळे उपलब्ध झालेली करमणुकीची इतर साधणे यात लोककला भरडल्या गेल्या. हे भरडणे इतकं भयानक होते की, कलापथकात काम करणारे शेकडो लोककलावंत रस्त्यावर आले. चीत्रपट, नाटक, संगीत मैफिली या मनोरंजनाच्या माध्यमांप्रमाणे तमाशाला प्रेक्षक टीकून आहे; परंतु चीत्रपट, नाटक, संगीत मैफिली यांचे जसे टिकीटाचे दर वाढले तसे तमाशाचे तिकीटाचे दर, इतर लोककला सादरीकरणाची बीदागी वाढली नाही.

त्यामुळे लोककलांचे अर्थकारण अडचणीत सापडले. स्पर्धेत टीकण्यासाठी उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने लोककला सादर करणाऱ्या पथकांवर कर्जाचा बोजा वाढला. खर्च भागविण्यासाठी सहाजिकच पथकाच्या मालकांना खासगी सावकाराचा आश्रय घ्यावा लागला. खासगी सावकार लोककलावंतांना वाटेल त्या व्याजदराने कर्जपुरवठा करतात. त्यामुळे घेतलेल्या कर्जाचे व्याजही हे कलावंत फेडू शकत नाहीत. परिणामी कर्जाचा डोंगर वाढून कलापथक अडचणीत आले. अशा प्रकारे महाराष्ट्रातील जवळ जवळ ३१ तमाशे बंद पडले आहेत. दशावतार सादर करणाऱ्या अनेक कंपन्या नामशेष झाल्या. लावणीचे ग्रुप कमी झाले. लोककलांची आर्थिक घडी कशी विस्कटली. ती विस्कटण्यास कारणीभूत घटक कोणते? तमाशा आणि लावणीचा अपवाद सोडला, तर अनेक लोककलांना राजाश्रयच नाही. तर मदत मीळणार कशी? महाराष्ट्राच्या अस्सल लोककलेची होणारी फरपट थांबविण्यासाठी काय उपाय योजता येतील, हे शोधण्यासाठी हा विषय निवडला आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :**

महाराष्ट्राची सांस्कृतीक परंपरा जशी संपन्न आहे, तशी लोककलेचीही. या लोककलेला ग्रामीण जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. कारण महाराष्ट्रात विठ्ठलाची वारी आणि तमाशाची बारी, व इतर लोककलांना सारखेच महत्व आहे. ग्रामीण भागातील शेतकरी जेवढ्या श्रद्धेने विठ्ठलाच्या वारीला जातो, तेवढ्याच नीर्मळ मनाने तमाशाच्या बारिलाही जातो. दशावतार, लावणी, जागरण गोंधळ, भारूड आदी लोककलांचाही आनंद घेतो. या फक्त लोककला नसून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची अविभाज्य सांस्कृतीक परंपरा आहे. जग कीतीही डिजीटल झाले, मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध असली तरी लोककलांच्या कलापथकाशीवाय ग्रामीण भागात ग्रामदेवतेची यात्रा होऊ शकत नाही. शहराकडे जाण्याचा ओघ वाढला असला तरी खरा महाराष्ट्र खेड्यातच वसला आहे. खेड्यातील लोक शेतात वर्षभर राबत असतात. या राबणाऱ्या हातांना जत्रा-यात्रांच्या नीमीत्ताने थोडी उसंत मीळते. म्हणून गावातल्या यात्रा- जत्रा आजही उत्साहाने साजऱ्या होतात. या यात्रांमधील तमाशा, दशावतार, लावणी, जागरण गोंधळ, कीर्तन यांसारख्या लोककला कष्टकèयांना मनोरंजनातून आनंदाच्या अनुभूतीची ऊर्जा देते. म्हणून लोककलांचा प्रेक्षक जिवंत आहे. लोकाश्रयाच्या बाबतीत समृद्ध असलेल्या लोककला राजाश्रयाअभावी अखेरच्या घटका मोजत आहेत. लोककलांना प्रेक्षक आहेत; परंतु त्यांच्या टिकीटाचे किंवा बीदागीचे दर वाढले नाहीत. त्यामुळे लोककला पथकांची आर्थिक घडी विस्कटली. ती कशी विस्कटली, हे अभ्यासून लोककला अर्थात आपली संस्कृती, परंपरा जपण्यासाठी काय उपाय योजता येतील, यासाठी संशोधकाने हा विषय संशोधांनासाठी निवडला.

**संशोधन पद्धती:**

संशोधक संशोधनासाठी महाराष्ट्रातील लोककलेचा आर्थिक व सामाजिक अभ्यास हा विषय विश्लेषणात्मक मांडणार असून, माहीती व आकडेवारी गोळा करण्यासाठी प्राथमीक व दुय्यम माहीतीचा अवलंब केला जाणार आहे.

**माहीतीचे स्त्रोत**

**१) प्राथमीक स्त्रोत :**

१) प्रत्यक्ष लोककला पथक मालकांच्या भेटी घेऊन मुलाखतीद्वारे माहीती मीळविणे

२) लोककला सादर करणारे फड, ग्रुप, खेळमालक, कलाकार, व्यवस्थापक यांना भेटून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहीती मीळविणे

**२) दुय्यम स्त्रोत :**

१) लोककलाविषयक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रातील लोककलाविषयक प्रसिद्ध झालेल्या लीखाणातून माहीती घेणार आहे

२) सांस्कृतीक विभाग महाराष्ट्र शासन, सांस्कृतीक विभाग, अहमदनगर आदी कार्यालयातून माहीती मीळविणार आहे.

**अ) नमुना नीवड :**

राज्यात व्यावसायीक पद्धतीने कला सादर करणाऱ्या तमाशा, लावणी, दशावतार व जागरण गोंधळ या कला अभ्यासासाठी नीवडण्यात आल्या आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी नीवडलेल्या लोककलांच्या सर्वच कलावंतांकडून माहीती संकलीत करणे स्वतंत्रपणे काम करणाऱ्या संशोधकासाठी कठीण, वेळखाऊ व खर्चीक काम आहे. लोककलेचे प्रकार नीवडीसाठी कोटा पद्धतीचा तर लाभार्थी नीवडीसाठी सोईस्कर नमुना नीवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

**३. तथ्य विश्लेषणाची साधने:**

संकलीत करण्यात आलेल्या माहीती व आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, वृद्धीदर इत्यादी गणीतीय व सांखिकी साधनाचा वापर करण्यात येईल. याशीवाय सारणी, वृत्तालेख, स्तंभालेख व रेषालेख याचा आवश्यकतेनुसार वापर करण्यात येईल.

**अध्ययन विषयाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन विषयात जागतीकीकरणानंतर महाराष्ट्रातील लोककलेचा आर्थिक व सामाजिक अभ्यास हा विषय संशोधनासाठी घेतला आहे. महाराष्ट्रात १० पेक्षा जास्त लोककला अस्तीत्वात आहेत. या सर्व लोककला व त्यांच्यातील लोककलांचे अध्ययन करण्यासाठी वेळ, खर्च व अचूक माहीती मीळविण्यासाठी मर्यादा नीर्माण होते. त्यामुळे तमाशा, लावणी, दशावतार, जागरण गोंधळ या चार लोककला नीवडण्यात आल्या आहेत. या चारही लोककलांमधून हजारो कामगार कलावंतांना रोजगार नीर्माण झाला आहे. शासनमान्य लोककलेच्या संघटनांकडे असलेल्या आकडेवारीच्या सहाय्याने संशोधन करण्यात येणार आहे. संशोधकाने नीवडलेला विषय फक्त महाराष्ट्रातील लोककला असल्याने यातून मीळालेले नीष्कर्ष महाराष्ट्रातील लोककला व्यवसायाच्या अर्थकारणापुरतेच मर्यादीत राहणार नाही. संशोधनासाठी २०११-१२ ते २०२१-२२ हा कालावधी नीवडण्यात आला.

**संदर्भसूची:**


1. ओव्हाळ प्रभाकर, १९९०, लावणीसम्राज्ञी, प्रथमावृत्ती, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
2. केळकर य. न., २००८, तंतकवी तथा शाहीर, प्रथमावृत्ती, डायमंड प्रकाशन, पुणे
3. केळूसकर महेश, २०१७, दशावतार प्रथम आवृत्ती, अनघा प्रकाशन, मुंबई
4. कोठारी सी. आर, २००४, रिसर्च मेथडॉलॉजी, तृतीय आवृत्ती, इंटरनॅशनल पब्लीकेशन, द{ल्ली
5. खुडे सोपान ,२००३, काळू बाळू, प्रथमावृत्ती, राजहंस प्रकाशन, पुणे
6. खेडलेकर संतोष, २०१०, सम्राज्ञी कांताबाई सातारकर, प्रथमावृत्ती, शब्दालय प्रकाशन ,श्रीरामपूर
7. डेरे रा. ची., १९९९, लोकसंस्कृतीचे उपासक, प्रथम आवृत्ती, चीन्मय प्रकाशन, औरंगाबाद
8. देखणे रामचंद्र, २०१०, महाराष्ट्राची लोकधारा, द्वितीय आवृत्ती, साकेत प्रकाशन, पुणे
9. मोरजे गंगाधर, १९९०,शाहीर परसराम, प्रथमावृत्ती, देव लक्ष्मी प्रकाशन, पुणे
10. येतीकर बापूराव, १९९५, पट्टे बापूराव कृत भेदक लावण्या, प्रथमावृत्ती, डायमंड प्रकाशन, पुणे
11. लामखेडे मा. रा., लोकपरंपरेची सत्वधारा,प्रथमावृत्ती, अजब प्रकाशन, कोल्हापूर
12. वायकर भूषण, २०१२, महाराष्ट्रातील तमाशाचे अर्थशास्त्र, संशोधन प्रबंध, पुणे विद्यापीठ
13. वाळके मार्तंड, २०१७, भक्तीमल्हार, प्रथम आवृत्ती, प्राजक्ता प्रकाशन, पुणे
14. व्हटकर नामदेव, २००२, लोकनाट्य तमाशा कला व साहीत्य, प्रथमावृत्ती, नवीन उद्योग प्रकाशन, पुणे